॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

**OFFICE OF THE REGISTRAR**

website: srtmun.ac.in
Email: registrar@srtmun.ac.in

**जा. क्र.** आस्था/०२ / २०२६ -२७ / ५२ दि. १५ जुलै, २०२६

# परिपत्रक

**प्रस्तुत विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील 'उत्कृष्ट शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी' पुरस्काराबाबत...**

प्रस्तुत विद्यापीठ परिसर व उपपरिसरातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील प्रशासकीय यंत्रणा प्रभावीपणे कार्यप्रवण करण्यात शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असते, म्हणूनच त्यांच्या उत्कृष्ट कामाचा गुणगौरव व्हावा, या हेतूने प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात **'उत्कृष्ट शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी'** पुरस्कार देण्यात येतात. यावर्षीही मा. व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या नवीन नियमावलीनुसार विद्यापीठ परिसर/ उपपरिसरांतून ०६ तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधून ०५ असे एकूण ११ पुरस्कार वितरित केले जाणार आहेत. यासाठी विहित नमुन्यामध्ये अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत विद्यापीठ परिसर व उपपरिसरातील तसेच संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी यांनी आपले अर्ज विहित नमुन्यात भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह **दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत** निम्नस्वाक्षरीकर्त्याच्या कार्यालयात संबंधित विभागप्रमुख / संचालक/ प्राचार्य यांचेमार्फत अग्रेषित करून पाठवावेत. समितीस गुणदान करता यावे यासाठी आवश्यक ती कागदपत्रे अनुक्रमनिहाय जोडण्यात यावीत. तसेच नवीन नियमावलीनुसार गुणदान करण्यासाठी विभागप्रमुख / संचालक/ प्राचार्य यांचा अभिप्राय (गोपनीय) बंद पाकीटात स्वतंत्रपणे अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

उपरोक्त तारखेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही, उक्त पुरस्काराबाबतची नियमावली, अर्जाचा नमुना, विभागप्रमुखाचा अभिप्राय तसेच आस्थापना विभागाने सादर करावयाच्या माहितीचा नमूना प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **Home → Administration → Employees Forum** या मथळ्याखाली उपलब्ध आहे.

स्वा /-
**(प्रा. डॉ. ज्ञानेश्वर दा. पवार )**
कुलसचिव

**प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:**

१. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
२. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
३. संचालक तथा विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. संचालक, विद्यापीठ उप परिसर, लातूर व परभणी
५. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
६. सिस्टीम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ (प्रत विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.)

**प्रत माहितीस्तव:**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

DR. DNYANESHWAR DADAJI PAWAR

Digitally signed by DR. DNYANESHWAR DADAJI PAWAR DN: c=IN, o=SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED, ou=ALL TYPE OF DEPARTMENT, 2.5.4.20=a8d13d0a98a58a99002704fcedc6470fc7efc0cd8150c6a879c09cff14013f61, postalCode=431606, st=Maharashtra, cn=DR. DNYANESHWAR DADAJI PAWAR Date: 2026.07.15 16:18:06 +05'30'

**(प्रा. डॉ. ज्ञानेश्वर दा. पवार )**
कुलसचिव